गुरुवार दि. २२ ऑक्टोबर २०२६ ● जालना ● वर्ष ८ वे ● अंक ४९ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### जालना जिल्ह्यात पाणी वापराबाबत जिल्हाधिकाऱ्यांचे कडक निर्देश

## पिण्याच्या पाण्याचा काटकसरीने वापर करा; पाण्याची नासाडी रोखण्याचे आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थिती आणि पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर उपलब्ध पिण्याच्या पाण्याचा काटकसरीने वापर करावा, पाण्याची नासाडी रोखावी तसेच प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा पुनर्वापर वाढवावा, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या अध्यक्षा आशिमा मित्तल यांनी दिले आहेत. सन २०२६ च्या खरीप हंगामात 'ट्रिगर-१' लागू असलेल्या तालुक्यांमध्ये या आदेशाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

जालना जिल्ह्यातील काही भागांत अपुरा व अनियमित पाऊस, उपलब्ध जलसाठ्यांवरील वाढता ताण आणि भूजल पातळीत होणारी घट लक्षात घेता पिण्याच्या पाण्याचे संरक्षण करणे आवश्यक झाले आहे. या परिस्थितीत नागरिकांसह शासकीय व निमशासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, शैक्षणिक संस्था, खासगी आस्थापना, बांधकाम व्यावसायिक, कंत्राटदार आणि पाणीपुरवठादारांनी पाण्याचा जबाबदारीने वापर करावा, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

**पिण्याच्या पाण्याला प्रथम प्राधान्य**

पिण्याचे पाणी, स्वयंपाक, वैयक्तिक व परिसराची स्वच्छता, आरोग्यसेवा, अग्निशमन तसेच पशुधनासाठी आवश्यक असलेल्या पाण्याच्या वापराला प्राधान्य द्यावे. पिण्याच्या पाण्याचा अनावश्यक वापर करून बांधकाम, वाहन धुलाई, रस्ते व परिसर स्वच्छता आणि अन्य बिगर-पेयजल कामे करू नयेत, असे निर्देश देण्यात आले आहेत. अशा कामांसाठी प्रक्रिया केलेले पाणी, पुनर्वापरित पाणी किंवा अन्य योग्य पर्यायी जलस्रोतांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**आरओ केंद्रांना पाण्याच्या अपव्ययाबाबत सूचना**

दुष्काळ व पाणीटंचाईच्या काळात जिल्ह्यातील आरओ वॉटर सेंटर आणि पाणी शुद्धीकरण केंद्रांनी उपलब्ध पाण्याचा काटकसरीने व कार्यक्षमतेने वापर करावा. पाणी शुद्धीकरण प्रक्रियेदरम्यान निर्माण होणाऱ्या 'रिजेक्ट वॉटर'चा अनावश्यक अपव्यय टाळून त्याचा योग्य पुनर्वापर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या पाण्याचा पुनर्वापर शक्य नसल्यास लागू नियम व तांत्रिक निकषांनुसार त्याची विल्हेवाट लावावी. संबंधित अधिकाऱ्यांनी या केंद्रांची तपासणी करून नियमांचे उल्लंघन आढळल्यास आवश्यक कारवाई करावी.

*वाहन धुलाई केंद्रांवर निर्बंध*

वाहन धुलाई केंद्रांनी सार्वजनिक पाणीपुरवठा योजनेतील पिण्याच्या पाण्याचा वाहन धुण्यासाठी अनावश्यक वापर टाळावा. शक्य असेल तेथे पुनर्वापरित पाणी किंवा कायदेशीररीत्या उपलब्ध पर्यायी जलस्रोतांचा वापर करावा. पाण्याची बचत करणाऱ्या पद्धतींचा अवलंब करणे बंधनकारक राहणार असून, संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था व सक्षम प्राधिकरणांनी तपासणी करून पाण्याचा अनावश्यक अपव्यय होणार नाही, याची खात्री करावी.

**बांधकामासाठी प्रक्रिया केलेल्या पाण्याचा वापर**

बांधकाम, काँक्रीट क्युरिंग, बांधकाम परिसरातील धूळ नियंत्रण, रस्ते व परिसर स्वच्छता अशा बिगर-पेयजल कामांसाठी पिण्याच्या पाण्याचा वापर करू नये. त्याऐवजी प्रक्रिया केलेले सांडपाणी, पुनर्वापरित पाणी किंवा अन्य योग्य पर्यायी जलस्रोतांचा वापर करावा. उपलब्ध पाण्याचा अपव्यय होणार नाही, याची जबाबदारी संबंधित बांधकाम व्यावसायिक व कंत्राटदारांवर राहणार आहे.

**सांडपाण्यावर प्रक्रिया करून पुनर्वापर करण्यावर भर**

महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती आणि इतर संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात उपलब्ध असलेल्या प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा बांधकाम, धूळ नियंत्रण, रस्त्यांवर पाणी शिंपडणे, उद्याने आणि इतर योग्य कामांसाठी पुनर्वापर करण्याचे नियोजन करावे. पुनर्वापरासाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्याची गुणवत्ता व सुरक्षितता आवश्यक तांत्रिक निकषांनुसार तपासावी, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

*गळती रोखण्याचे (पान २ वर)

## जालना जिल्हा पोलीस दलातर्फे हुतात्मा पोलिसांना सशस्त्र मानवंदना!

**जालना - प्रतिनिधी**



देशाची अंतर्गत सुरक्षा, कायदा व सुव्यवस्था राखताना आणि नागरिकांच्या जीविताचे व मालमत्तेचे संरक्षण करताना कर्तव्य बजावून प्राणांची आहुती देणाऱ्या वीर पोलीस हुतात्म्यांना जालना जिल्हा पोलीस दलाच्या वतीने बुधवारी, २१ ऑक्टोबर रोजी भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. पोलीस स्मृती दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात तीन राऊंड फायर करून हुतात्मा पोलिसांना सशस्त्र मानवंदना देण्यात आली. यावेळी पोलिसांच्या शौर्याचा, त्यागाचा आणि कर्तव्यनिष्ठेचा गौरव करत त्यांच्या सर्वोच्च बलिदानाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

कर्तव्य बजावताना स्वतःच्या प्राणांची पर्वा न करता नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देणाऱ्या पोलीस अधिकारी आणि अंमलदारांचे स्मरण या कार्यक्रमाच्या माध्यमातून करण्यात आले. देशाच्या सुरक्षेसाठी प्राणार्पण करणाऱ्या या वीरांचे बलिदान व्यर्थ जाणार नाही, तर त्यांच्या शौर्याचा आदर्श प्रत्येक पोलीस कर्मचाऱ्याला कर्तव्य बजावताना प्रेरणा देत राहील, अशी भावना या अभिवादनातून व्यक्त झाली. २१ ऑक्टोबर हा दिवस देशभरात पोलीस स्मृती दिन म्हणून पाळला जातो. या दिनाचे औचित्य साधून जालना जिल्हा पोलीस दलाच्या वतीने हुतात्मा पोलिसांना मानवंदना देण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी तीन राऊंड फायर करून सशस्त्र मानवंदना अर्पण करण्यात आली. उपस्थित अधिकारी आणि अंमलदारांनी वीर हुतात्म्यांच्या शौर्याचे स्मरण करत त्यांना आदरांजली वाहिली. पोलीस दलातील प्रत्येक अधिकारी आणि अंमलदारावर नागरिकांच्या संरक्षणाची मोठी जबाबदारी असते. गुन्हेगारीला आळा घालणे, कायद्याची अंमलबजावणी करणे, आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना मदत करणे आणि समाजात शांतता कायम राखणे, यासाठी पोलिसांना अनेकदा प्रतिकूल परिस्थितीत काम करावे लागते. अशा कर्तव्यपालनात अनेकांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले आहे. त्यांच्या त्यागाची आठवण ठेवणे आणि त्यांच्या कार्याचा गौरव करणे, हा पोलीस स्मृती दिनाचा महत्त्वपूर्ण उद्देश आहे. भारतामध्ये २१ ऑक्टोबर हा दिवस पोलीस स्मृती दिन म्हणून पाळला जातो. १९५९ मध्ये लडाखमधील हॉट स्प्रिंग्ज परिसरात चिनी सैन्याच्या हल्ल्यात शहीद झालेल्या भारतीय पोलीस दलातील जवानांच्या स्मरणार्थ हा दिवस पाळण्याची परंपरा सुरू झाली. त्या घटनेत कर्तव्य बजावताना प्राण गमावलेल्या (पान २ वर)

### भाजपाच्या जिल्हा कार्यालयाच्या बांधकामाला गती -भास्कर दानवे यांच्याकडून प्रत्यक्ष पाहणी



**जालना - प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी चे नवीन होत असलेल्या जिल्हा कार्यालयाच्या बांधकामाची भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी सुरू असलेल्या बांधकामाच्या प्रगतीचा श्री.वाघ यांच्याकडून घेतला व बांधकाम दर्जेदार व्हावे याबाबत सूचना केल्या यावेळी देविदास देशमुख, बाबासाहेब कोलते दिसत आहे.

## अधर्मावर धर्माचा आणि असत्यावर सत्याचा विजय: परतुरात उत्साहात पार पडला भव्य रावण दहन सोहळा

**परतूर - प्रतिनिधी**



परतूर येथील श्री साईनाथ मंदिर परिसरात २० ऑक्टोबर रोजी विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर दसरा उत्सव समितीच्या वतीने पारंपारिक आणि भव्य रावण दहन सोहळा अत्यंत उत्साहात, जल्लोषात व मोठ्या जनसागराच्या उपस्थितीत पार पडला. ''वाईट विचारांवर चांगल्या विचारांचा विजय'' आणि ''असत्यावर सत्याचा विजय'' हा संदेश देणाऱ्या या ऐतिहासिक सोहळ्यास हजारो नागरिकांनी व लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वच वयोगटातील नागरिकांनी हजेरी लावली होती. या अभूतपूर्व गर्दीमुळे परिसराला अक्षरशः यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते.

आ. बबनराव लोणीकर यांचे मार्गदर्शन व विचार

कार्हा कार्यक्रमाचे मुख्य अतिथी तथा माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, ''रावण हा ऋद्धी-सिद्धी प्राप्त बलाढ्य राक्षस होता, ज्याचा पृथ्वीतलावर पराभव कुणीही करू शकत नव्हता. मात्र, रावण हा अहंककारी व दुष्टवृत्तीचा असल्यामुळे त्याचा अंत झाला. त्याच्या मृत्यूचे रहस्य त्याचा भाऊ बिभीषणने उघड केले. त्यामुळे अहंकार आणि वाईट वृत्तीचा नाश अटळ आहे.''

त्यांनी पुढे स्पष्ट केले की, आजच्या काळात रावण दहन म्हणजे केवळ पुतळा जाळणे नव्हे, तर आपल्या मनातील राग, द्वेष, अहंकार, भ्रष्टाचार आणि जातीयता यांसारख्या वाईट विचारांचे दहन करणे होय. जेव्हा आपण आपल्यातील नकारात्मकता संपवून चांगल्या विचारांची कास धरू, तेव्हाच खऱ्या अर्थाने रामराज्याची निर्मिती होईल. याशिवाय, सध्याच्या दुष्काळ परिस्थितीमुळे शेतकरी व नागरिक चिंतेत असून, त्यांच्या मदतीसाठी सरकार तयारी करत आहे आणि या परिस्थितीवर (पान २ वर)

## आयोडिनयुक्त मीठाचा वापर करु या, गलगंड पासुन मुक्त होऊ या : डॉ. जयश्री भुसारे

**जालना - प्रतिनिधी**




जागतिक आयोडिन न्युनता विकार नियंत्रण दिनाच्या अनुषगांने डॉ.जयश्री भुसारे यांनी या प्रसंगी सांगितले की, 'आयोडिनयुक्त मीठाचा वापर करु या, गलगंड पासुन मुक्त होऊ या' ज्यामुळे गलगंड आजार नियंत्रित ठेवणे शक्य होईल. दरवर्षी २१ ऑक्टोबर रोजी जागतिक आयोडिन न्युनता विकार नियंत्रण दिन साजरा करण्यांत येतो. भारतामध्ये आयोडिनची कमतरता लक्षात घेऊन केंद्र शासनाने सन १९६२ पासुन राष्ट्रीय गलगंड नियंत्रण कार्यक्रम सुरु करण्यांत आला. राष्ट्रीय गलगंड नियंत्रण कार्यक्रमाचे नांव सन १९९२ मध्ये बदलुन राष्ट्रीय आयोडिन न्युनता विकार नियंत्रण कार्यक्रम असे करण्यांत आले. हा दिवस साजरा करण्यांचे उदिद्ष्ट गलगंड, आयोडिन न्युनता विकार कमी करुन नियंत्रित ठेवणे तसेच त्याबाबत जनजागृती करुन भविष्यात या रोगाचे रुग्ण आढळुन येणार नाही याची दक्षता घेणे.

आजच्या युगात फास्टफुड मॅगी, जंकफुड, पिझ्झा, बर्गर खाण्याच्या प्रमाणातः मोठया संख्येने वाढ झालेली आहे वाढ होत आहे. आजच्या लहान मुलांना व तरुणपिढीला फास्टफुड खाण्याची सवय लागली. त्यामुळे आयोडिनयुक्त अन्नपदार्थ, मीठाचा अभाव होतो. परिणामी आयोडिनच्या अभावामुळे गलगंड, थायरॉईड, शरीराची वाढ खुंटणे, हदयाची गती, शरीराचे तापमान, स्नायु आकुंचन, मानसिक आरोग्य व मेंदुवर परिणाम होतो. गळयाला सुज येणे, अनअपेक्षित वजनामध्ये वाढ होणे किंवा कमी होणे, थकवा, डोक्यावरील (पान २ वर)

## मत्स्योदरी अभियांत्रिकी महाविद्यालयात विद्युत विभागाच्या विद्यार्थी परिषदेचे उदघाटन

**जालना - प्रतिनिधी**



शहरातील मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी विद्यार्थी परिषद (इसा) चे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी एस.आर.जे. स्ट्रिप्स अँड पाईप्सचे इलेक्ट्रिकल प्रमुख श्री. किरण इंगळे यांनी विद्यार्थ्यांना विद्युत अभियांत्रिकी क्षेत्रातील करिअरच्या विविध संधींविषयी मार्गदर्शन केले. तसेच, औद्योगिक क्षेत्रात प्रात्यक्षिक ज्ञानाचे महत्त्व विशद करून विद्यार्थ्यांनी अद्ययावत तांत्रिक कौशल्ये आत्मसात करावीत, असे आवाहन केले.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. बिरादार यांनी अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांनी आपल्या करिअरविषयी सजग राहून आवड, क्षमता आणि मेहनतीच्या बळावर योग्य क्षेत्राची निवड करावी, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रत्येक वर्षातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच विद्युत अभियांत्रिकी व इंटरनेट ऑफ थिंग्ज () आधारित प्रकल्प प्रदर्शन, रील मेकिंग स्पर्धा आणि ट्रेझर हंट अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या तांत्रिक ज्ञानाला, सर्जनशीलतेला आणि संघभावनेला प्रोत्साहन मिळाले. याप्रसंगी विद्युत अभियांत्रिकी विभागप्रमुख प्रा. के. सी. ओ. रेड्डी, इसा समन्वयक प्रा. अल्फिया (पान २ वर)

## प्रशासन मतदानासाठी सज्ज : विभागीय आयुक्तांनी घेतला आठही जिल्ह्यांचा आढावा

### *मतदान केंद्रांवरील सुविधा, सुरक्षा व राजकीय पक्षांच्या बूथ व्यवस्थेची तपासणी
### *शुक्रवार २३ ऑक्टोबरला सकाळी ८ ते दुपारी ४ पर्यंत होणार मतदान

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**




औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज झाले असून, मतदान प्रक्रिया सुरळीत, निर्भय व पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी जी. श्रीकांत यांनी दिले.

शुक्रवार दि. २३ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी आज बुधवारी दुपारी ऑनलाइन पद्धतीने विभागातील आठही जिल्ह्यांचा आढावा घेतला.या बैठकीत छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धाराशिव, परभणी, नांदेड आणि हिंगोली या जिल्ह्यांतील निवडणूक तयारीचा आढावा घेण्यात आला.

मतदान केंद्रांवरील मूलभूत सुविधा, मतदारांसाठी आवश्यक व्यवस्था, मतदान साहित्याची उपलब्धता, अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती तसेच मतदान केंद्रांवरील सुरक्षा व्यवस्थेची माहिती यावेळी घेण्यात आली. मतदान केंद्रांच्या परिसरात राजकीय पक्षांच्या बूथ व्यवस्थेसाठी करण्यात आलेल्या नियोजनाचाही आढावा घेण्यात आला. मतदारांना कोणतीही अडचण न येता मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी मतदान केंद्रांवरील प्रवेश व्यवस्था, आवश्यक सुविधा, दिशादर्शक सूचना आणि मतदान प्रक्रियेसाठी नियुक्त कर्मचाऱ्यांची सज्जता यांची खातरजमा करण्यावर भर देण्यात आला. मतदान साहित्याचे (पान २ वर)

# संपादकीय...

## अवैध दारू; पुरवठा साखळीच्या मुळापर्यंत पोहोचणार का?

जिल्ह्यात अवैध दारूची वाहतूक रोखण्यासाठी पोलिसांनी केलेली प्रत्येक कारवाई महत्त्वाचीच आहे. जालना तालुक्यातील देवमूर्ती परिसरात पोलीस अधीक्षकांच्या विशेष पथकाने छापा टाकून देशी-विदेशी दारू आणि जितो पिकअप वाहनासह एकूण ३ लाख १८ हजार ४८ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. कारवाईचे स्वागत व्हायलाच हवे. मात्र, या कारवाईच्या निमित्ताने एक मूलभूत प्रश्न उपस्थित होतोअवैध दारू वाहतुकीत वापरले जाणारे वाहन जप्त झाले म्हणजे हा व्यवसाय थांबतो का, की त्यामागील संपूर्ण पुरवठा साखळी उघड झाल्यानंतरच कारवाईला खरा अर्थ प्राप्त होतो? दारूचा साठा पकडणे हा तपासाचा एक टप्पा आहे; अंतिम उद्दिष्ट नाही. जप्त केलेला साठा कुठून आला, त्याची वाहतूक कोणत्या मार्गाने केली जात होती, तो कोणाकडे पोहोचवला जाणार होता आणि या व्यवहारात आणखी कोणाचा सहभाग आहे, हे तपासातून स्पष्ट होणे गरजेचे आहे. अन्यथा एखाद्या कारवाईची नोंद होईल, मुद्देमाल जप्त होईल; पण त्याच मार्गाने किंवा पर्यायी मार्गाने पुन्हा अवैध वाहतूक सुरू होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. देवमूर्ती परिसरातील कारवाईत वाहनचालक, वाहनमालक आणि कथित दारू पुरवठादार अशी तिघांची नावे समोर आली आहेत. मात्र, नावे समोर येणे आणि संपूर्ण व्यवहाराचे स्वरूप उघड होणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. संबंधित व्यक्तींची भूमिका, दारूच्या साठ्याचा स्रोत, वाहतुकीचे प्रयोजन आणि परस्परांतील संबंध याबाबत अधिकृत तपासातूनच निष्कर्ष निघू शकतात. त्यामुळे कोणालाही दोषी ठरविण्याची घाई न करता पुराव्यांच्या आधारे तपास पुढे जाणे आवश्यक आहे. या प्रकरणात दारूचा साठा परवानाधारक विक्री व्यवस्थेतून आला होता की अन्य मार्गाने मिळविण्यात आला, त्याच्या वाहतुकीसाठी आवश्यक कागदपत्रे होती का आणि संबंधित व्यवहारात नियमांचे उल्लंघन झाले का, याची पडताळणी महत्त्वाची ठरते. जप्त केलेल्या दारूचे प्रकार, प्रमाण आणि स्रोत यांची माहिती एकत्रित केल्यास तपासाला अधिक स्पष्ट दिशा मिळू शकते. महत्त्वाचा मुद्दा असा की, पोलिसांच्या हाती लागलेले वाहन हे वाहतुकीचे साधन आहे; अवैध व्यवहाराचे संपूर्ण जाळे नव्हे. त्यामुळे तपासाचा भर केवळ जप्तीवर न राहता पुराव्यांद्वारे संपूर्ण व्यवहार समजून घेण्यावर असायला हवा. अवैध दारूविरोधात किती छापे टाकले, किती वाहने जप्त केली किंवा किती मुद्देमाल हस्तगत केला, यावरून मोहिमेची व्याप्ती समजू शकते. मात्र, अशा कारवायांमुळे नियमबाह्य वाहतूक आणि विक्रीला प्रत्यक्ष किती आळा बसला, हेही तितकेच महत्त्वाचे आहे. एखाद्या भागात वारंवार अवैध दारू सापडत असेल, तर त्या भागातील वाहतुकीचे मार्ग, संशयास्पद हालचाली, पुरवठ्याचे संभाव्य स्रोत आणि विक्रीच्या पद्धती यांचा अभ्यास करण्याची गरज असते. गुप्त माहितीचे संकलन, स्थानिक पातळीवरील पडताळणी आणि संबंधित विभागांशी समन्वय यांमुळे तपास अधिक प्रभावी होऊ शकतो. याचा अर्थ प्रत्येक प्रकरणामागे संघटित टोळी आहे, असा निष्कर्ष काढणे नव्हे. मात्र, वारंवार घडणाऱ्या घटनांमध्ये समान धागे आढळतात का, हे तपासणे पोलिसांच्या दृष्टीने आवश्यक आहे. समान स्रोत, वाहतुकीचे मार्ग किंवा व्यवहारातील संबंध पुराव्यांद्वारे समोर आल्यास त्यानुसार पुढील कारवाई करता येऊ शकते. अवैध दारूच्या व्यवहारांमुळे शासनाच्या महसुलावर परिणाम होऊ शकतो. त्याचबरोबर परवाना, उत्पादन, वाहतूक आणि विक्रीसंदर्भातील नियमांचे उल्लंघन होत असल्यास कायद्याच्या अंमलबजावणीवरही प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे अशा प्रकरणांकडे केवळ जप्त केलेल्या मुद्देमालाच्या किमतीपुरते पाहणे योग्य ठरणार नाही. अवैध दारू कुठे विकली जाणार होती, तिचा संभाव्य ग्राहकवर्ग कोणता होता आणि संबंधित विक्री किंवा वाहतुकीमुळे कोणत्या नियमांचे उल्लंघन झाले, हे तपासातून स्पष्ट झाले पाहिजे. त्यानुसार संबंधित कायद्यांतील तरतुदींची अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. मात्र, तपास पूर्ण होण्यापूर्वी कोणत्याही व्यक्तीविषयी अंतिम निष्कर्ष काढणे टाळले पाहिजे. पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने केलेली ही कारवाई अवैध दारू वाहतुकीविरोधातील प्रयत्नांचा एक भाग आहे. आता या कारवाईतून मिळालेल्या माहितीचा उपयोग पुढील तपासासाठी किती प्रभावीपणे होतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. जप्त केलेल्या साठ्याच्या स्रोताची पडताळणी, वाहनाच्या वापरासंबंधी कागदपत्रांची तपासणी, वाहतुकीच्या मार्गाची माहिती आणि संभाव्य प्राप्तकर्त्यांचा शोध या बाबींना तपासात महत्त्व द्यावे लागेल. उपलब्ध पुराव्यांनुसार अन्य व्यक्ती किंवा व्यवहारांचे धागेदोरे समोर आल्यास त्यांचीही कायदेशीर चौकशी व्हायला हवी. यासोबतच अवैध दारूची वाहतूक होण्याची शक्यता असलेल्या मार्गांवर लक्ष ठेवणे, नागरिकांकडून मिळणाऱ्या माहितीची गोपनीयतेने पडताळणी करणे आणि कारवाईच्या निष्कर्षांचा नियमानुसार आढावा घेणे आवश्यक आहे. अशा सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे एका छाप्यापलीकडे जाऊन प्रतिबंधात्मक परिणाम साधता येऊ शकतो. देवमूर्तीतील कारवाईत ३ लाख १८ हजार ४८ रुपयांचा मुद्देमाल जप्त होणे ही निश्चितच नोंद घेण्यासारखी बाब आहे. मात्र, नागरिकांच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, अशा कारवायांमुळे अवैध दारूची वाहतूक आणि विक्री कमी होते आहे का? संबंधित प्रकरणांचा तपास योग्य दिशेने पुढे जात आहे का? आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर पुराव्यांच्या आधारे कायदेशीर कारवाई होत आहे का? या प्रश्नांची उत्तरे केवळ प्रसिद्धिपत्रकांतील जप्तीच्या आकड्यांतून मिळत नाहीत. तपासाची कायदेशीर प्रगती, न्यायालयीन प्रक्रियेतील पुढील टप्पे आणि अवैध व्यवहारांना आळा घालण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांमधूनच कारवाईची व्यापक परिणामकारकता स्पष्ट होऊ शकते. देवमूर्तीतील छापा हा अवैध दारूविरोधातील कारवाईचा महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो. आता तपासातून नेमके काय निष्पन्न होते, याकडे लक्ष राहील. कारवाईची खरी कसोटी केवळ किती मुद्देमाल जप्त झाला यात नाही; तर कायद्याचे उल्लंघन सिद्ध करणारे पुरावे समोर येतात का, संबंधित व्यवहाराची साखळी उलगडते का आणि भविष्यात अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी प्रभावी उपाय होतात का, यात आहे.

# पोलिस हुतात्मा दिन

२१ ऑक्टोबर, हा दिवस संपूर्ण देशात पोलीस हुतात्मा दिन म्हणून पाळला गेला. अखंड देशासाठी त्यागाची भावना ठेवून कर्तव्यावर असलेले अनेक पोलीस जवान शहीद होतात त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस पाळण्यात येतो. २१ ऑक्टोबर १९५९ रोजी पोलीस दलातील १० पोलीस शिपाई लडाख हद्दीत भारत - तिबेट सीमेवर व दोन हजार पाचशे हॉट ग्रीन या सीमेवर निर्जन बर्फाच्छादित प्रदेशात कडाक्याच्या थंडीत गस्त घालत असताना धोकादायक पद्धतीने दबा धरून बसलेल्या चिनी सैनिकांच्या हल्ल्यात शहीद झाले. या दिवसाची आठवण रहावी तसेच देशामध्ये दहशतवादी हल्ल्यात, नक्षलवादी कारवाईत, समाज कंटक व हिंसक कृत्य करणाऱ्यांकडून कर्तव्यावर असताना शहीद झालेल्या जवानांच्या स्मृतीला या दिवशी उजाळा दिला जातो.

२४ तास ऑन ड्युटी असे पोलिसांचे वर्णन केले जाते. कारण जनतेच्या सेवेसाठी ते २४ तास तयार असतात गणेशोत्सव असो की नवरात्र, दसरा असो की दिवाळी, ईद असो की नाताळ देशातील जनतेला सुरक्षित ठेवण्यासाठी ते कायम तत्पर असतात. जेंव्हा आपण आपल्या कुटुंबासोबत हे सण साजरे करत असतो, तेंव्हा ते आपल्या सुरक्षेसाठी कुटुंबापासून दूर असतात. त्यांच्यामुळेच आपण सर्व सण, उत्सव आनंदाने साजरे करू शकतो. मोर्चे, आंदोलने, निवडणुका पोलिसांशिवाय पार पडूच शकत नाही. मोर्चे, आंदोलने, निवडणुकीसाठी कायम पोलीस बंदोबस्त तैनात असतो. कोणतीही आपत्ती येऊ मग ती निसर्ग निर्मित असो की मानव निर्मित जनतेच्या रक्षणासाठी सर्वात प्रथम पोलिसच हजर असतात. पोलिस जनतेच्या सुरक्षेसाठी काय करू शकतात हे मुंबईवर झालेल्या २६ / ११ च्या पाक पुरस्कृत दहशतवादी हल्ल्यात जगाने पाहिले आहे. केवळ पोलिसांच्या धाडसामुळे मुंबईवर हल्ला करण्याचा दहशतवाद्यांचा डाव त्यांच्यावरच उलटला. प्राणाची बाजी लावून पोलिसांनी मुंबई वाचवली. या हल्ल्यात अनेक पोलीस शहीद झाले. स्वतःच्या प्राणांची आहुती देऊन पोलिसांनी मुंबईकरांचा जीव वाचवला.

१९९२ साली मुंबईत झालेल्या जातीय दंगलीतही पोलिसांचे कार्य अतुलनीय असेच होते. कोरोना सारख्या महामारीत तर पोलिसांचे महत्व आणखी अधोरेखित झाले. देशवासियांना कोरोनाच्या महामारीपासून वाचवण्यासाठी पोलिसांनी जे कार्य केले त्याला तोड नाही. कोरोनाने हजारो पोलिसांचा बळी घेतला तरीही पोलीस आपल्या कर्तव्यापासून तसूभरही हलले नाहीत. पंतप्रधानांनी त्यांना त्यांच्या या कार्यासाठी कोव्हिड योद्धा ही उपाधी दिली होती. पंतप्रधानांनी पोलिसांना दिलेली कोव्हीड योद्धा ही उपाधी सर्वार्थाने योग्य होती. देशातील कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आपल्या कुटुंबाची पर्वा न करता बारा ते अठरा तास प्रसंगी सुट्टी न घेता कर्तव्यावर राहून मातृभूमीचे रक्षण करण्यासाठी अनेक पोलीस जवान शहीद होतात. दहशतवादी, नक्षलवादी यासारख्या देशविघातक शक्तींविरुद्ध लढताना काहींना वीरमरण येते. अशा शहीद जवानांचे स्मरण करून त्यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करणे हे देशातील प्रत्येक नागरिकांचे कर्तव्यच आहे. या दिवशी सरकारच्या वतीने पोलीस हुतात्मा स्मारकास पुष्पचक्र अर्पण करून शहीद पोलीस जवानांना मानवंदना दिली जाते. हा दिवस देशातील सर्व पोलीस जवान, अधिकारी, कर्मचारी यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा व पवित्र आहे. पोलिस हुतात्मा दिनानिमित्त शहीद पोलीस जवानांना विनम्र अभिवादन !

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## महाराष्ट्र शासन सहकार विभागाकडून मनिष अग्रवाल यांची प्रमाणित लेखापरीक्षक म्हणून नियुक्ती

**परतूर – प्रतिनिधी**



महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१ व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे कलम ६९ मधील तरतुदीनुसार सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण करण्याकरिता येथील सहकार क्षेत्रातील तज्ञ मनिष अग्रवाल यांची गट क श्रेणीमध्ये सन २०२६ ते २०२८ या कालावधीसाठी प्रमाणित लेखापरीक्षक म्हणून महाराष्ट्र शासनाच्या सहकार विभागाच्या वतीने कक्ष अधिकारी प्रवीण तळेकर यांच्या स्वाक्षरीने काढलेल्या दि.१३ ऑक्टोबर च्या शासन निर्णयाद्वारे नियुक्ती करण्यात आली आहे.मनिष अग्रवाल यांना मागील १९ वर्षापासून सहकार क्षेत्रात असलेल्या अनुभवाच्या बळावर सदरील नियुक्ती करण्यात आली आहे.या नियुक्ती बद्दल मनिष अग्रवाल यांचे नातेवाईक,मित्र परिवार आणि सहकारातील अधिकारी – कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## रब्बी हंगामात कमी पाणी लागणाऱ्या पिकांना प्राधान्य द्या

### ऊस, गहू, मका, पिकांची लागवड टाळण्याचे आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यात परतीचा पाऊस झालेला नसल्याने जमिनीतील ओलावा कमी झाला असून, भूजल पातळीत सरासरी २.५ मीटरने घट झाली आहे. आगामी रब्बी हंगामातील संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता शेतकऱ्यांनी ऊस, गहू, मका, चिया यांसारख्या अधिक पाणी लागणाऱ्या पिकांची लागवड टाळावी. त्याऐवजी जमिनीचा प्रकार, उपलब्ध ओलावा आणि सिंचनासाठी उपलब्ध पाणी यांचा विचार करून पिकांची निवड करावी, असे आवाहन आत्माचे प्रकल्प संचालक श्री अमोल आगवण यांनी केले आहे.

संभाव्य एल निनोचा प्रभाव, पावसातील अनिश्चितता आणि पाणी उपलब्धतेचा विचार करता शेतकऱ्यांनी केवळ अंदाजांवर अवलंबून न राहता प्रत्यक्ष पर्जन्यमान व पाण्याची उपलब्धता यांचे मूल्यमापन करावे. मध्यम काळ्या जमिनीत उपलब्ध ओलावा व मर्यादित पाण्यानुसार करडई, हरभरा आणि रब्बी ज्वारी या पिकांना प्राधान्य द्यावे. जमिनीत पुरेसा ओलावा नसल्यास पेरणीची घाई करू नये. तसेच कोरडवाहू शेतीसाठी शिफारस केलेल्या वाणांचीच लागवड करावी.

कमी पाण्यात घेता येणाऱ्या करडई पिकासाठी मराठवाड्यात परभणी सुवर्णा (पीबीएनएस-१५४), परभणी कुसुम (पीबीएनएस-१२) आणि विद्यापीठाच्या अधिकृत शिफारशीनुसार पीबीएनएस-८६ (पूर्णा) या वाणांचा विचार करावा. खोल काळ्या जमिनीत चांगला अवशिष्ट ओलावा उपलब्ध असल्यास रब्बी ज्वारीची लागवड करावी. यासाठी परभणी सुपर मोती (एसपीव्ही-२४०७), परभणी मोती (एसपीव्ही-१४११) आणि पीकेव्ही क्रांती या वाणांची स्थानिक शिफारशीनुसार निवड करावी.

## पान १ व ४ वरुन...

### जालना जिल्ह्यात...

आणि पाणीपुरवठा यंत्रणेची देखभाल करण्याचे निर्देश*

पाणीपुरवठा योजनेतील नळ, टाक्या, पाइपलाइन आणि जोडण्यांमधील गळती तातडीने दुरुस्त करावी. टाक्यांमधून पाणी ओसंडून वाहणे, नळ सुरू राहणे किंवा अन्य कारणांमुळे होणारी नासाडी टाळण्यासाठी नियमित देखभाल करावी. पिण्याच्या पाण्याचा वापर करताना नागरिकांच्या आवश्यक गरजा आणि सार्वजनिक सेवांना प्राधान्य देऊनच अन्य कामांसाठी पाणी उपलब्ध करून द्यावे, असे निर्देश देण्यात आले आहेत.

*टँकरद्वारे पाणीपुरवठा करताना दक्षता*

दुष्काळी परिस्थितीत पाणीपुरवठ्यासाठी वापरण्यात येणाऱ्या शासकीय तसेच खासगी टँकरची टाकी, झडपा, पाइप आणि इतर उपकरणे सुरक्षित व सुस्थितीत असल्याची खात्री करावी. पाणी वाहतूक करताना गळती किंवा सांडपाणी होणार नाही, याची काळजी घ्यावी. टँकरमधून पाणी सांडणे, गळती होणे किंवा अन्य प्रकारे नासाडी होत असल्याचे आढळल्यास संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नोंद घेऊन जबाबदारी निश्चित करावी.

पाणीपुरवठादार व कंत्राटदारांनी पाण्याची नासाडी होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे. निष्काळजीपणा किंवा नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधितांवर लागू कायदे, नियम व करारातील अटींनुसार कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

*उल्लंघन झाल्यास कारवाई*

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी संबंधित विभागप्रमुख, स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकारी आणि सक्षम प्राधिकरणांना आदेशाची माहिती संबंधित कर्मचारी, कंत्राटदार व पाणीपुरवठादारांपर्यंत पोहोचविण्याचे निर्देश दिले आहेत. आदेशाची अंमलबजावणी झाल्यानंतर तिचा नियमित आढावा घ्यावा. उल्लंघन आढळल्यास संबंधित व्यक्ती किंवा संस्थेचे नाव, ठिकाण, दिनांक, वेळ, टँकर किंवा वाहन क्रमांक, उल्लंघनाचे स्वरूप आणि उपलब्ध छायाचित्रे अथवा व्हिडिओंसह अहवाल तयार करावा. त्यानुसार लागू कायदे व नियमांनुसार पुढील कारवाई करण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील पाणीटंचाईची परिस्थिती लक्षात घेऊन उपलब्ध जलसाठ्यांचे योग्य व्यवस्थापन करणे, पिण्याच्या पाण्याचे संरक्षण करणे आणि पाण्याचा अपव्यय रोखणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. त्यामुळे नागरिक, शासकीय यंत्रणा, बांधकाम व्यावसायिक आणि पाणीपुरवठादारांनी प्रशासनाच्या निर्देशांचे पालन करून पाणी बचतीस सहकार्य करावे, असे आवाहन जालना जिल्हा प्रशासनाने केले आहे.

### जालना जिल्हा...

जवानांच्या शौर्याची आठवण या दिवशी देशभरातील पोलीस दलांकडून जागवली जाते.

या दिनानिमित्त देशभरात कर्तव्य बजावताना हुतात्मा झालेल्या पोलीस अधिकारी आणि अंमलदारांना श्रद्धांजली अर्पण केली जाते. त्यांच्या शौर्याची नोंद ठेवणे, त्यांच्या कुटुंबीयांच्या त्यागाची जाणीव समाजाला करून देणे आणि नव्या पिढीमध्ये राष्ट्रसेवेची भावना दृढ करणे, हे या दिवसाचे महत्त्वाचे पैलू आहेत.

जालना येथे झालेल्या या कार्यक्रमाला जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक डॉ. विक्रम साळी, जिल्ह्यातील सर्व पोलीस उपअधीक्षक, विविध पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी तसेच पोलीस दलातील अधिकारी आणि अंमलदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. वरिष्ठ अधिकाऱ्यांसह उपस्थित पोलीस कर्मचाऱ्यांनी हुतात्म्यांच्या बलिदानाचे स्मरण करून त्यांच्याप्रती आदर व्यक्त केला. या कार्यक्रमातून पोलीस दलातील कर्तव्यनिष्ठा, शिस्त, धैर्य आणि समर्पण या मूल्यांना उजाळा देण्यात आला. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कार्यरत असलेल्या पोलीस यंत्रणेतील प्रत्येक घटकासाठी हुतात्मा पोलिसांचा त्याग हा प्रेरणादायी वारसा असल्याची जाणीव यानिमित्ताने अधोरेखित झाली.

पोलीस दल हे समाजाच्या सुरक्षिततेचे महत्त्वपूर्ण कवच आहे. गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यापासून ते सार्वजनिक शांतता राखण्यापर्यंत पोलिसांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. ही जबाबदारी पार पाडताना कधी जीविताला धोका पत्करावा लागतो, तर कधी कठीण आणि तणावपूर्ण परिस्थितीला सामोरे जावे लागते. अशा वेळी कर्तव्याला प्राधान्य देत देशासाठी प्राणार्पण करणाऱ्या हुतात्म्यांचे योगदान अतुलनीय आहे. पोलीस स्मृती दिन हा केवळ हुतात्म्यांच्या आठवणींना उजाळा देण्यापुरता मर्यादित नाही. त्यांच्या शौर्यापासून प्रेरणा घेऊन नागरिकांच्या संरक्षणासाठी अधिक जबाबदारीने कार्य करण्याची आणि कायद्याप्रती निष्ठा कायम राखण्याची जाणीव करून देणारा हा दिवस आहे. हुतात्मा पोलिसांनी दाखविलेल्या धैर्याचा आणि समर्पणाचा वारसा पुढे नेणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरते. जालना जिल्हा पोलीस दलाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमातून देशाच्या सुरक्षेसाठी आणि नागरिकांच्या रक्षणासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या सर्व वीर पोलीस हुतात्म्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. त्यांचे शौर्य, त्याग आणि कर्तव्यनिष्ठा सदैव स्मरणात राहतील आणि भावी पिढ्यांना राष्ट्रसेवेची प्रेरणा देत राहतील, हा संदेश या कार्यक्रमातून अधोरेखित झाला.

### आयोडिनयुक्त...

केस जाणे, त्वचा कोरडी पडणे इ.लक्षणे आढळुन येतात. भारतात उत्तरप्रदेश, विहार, मध्यप्रदेश, गुजरात या राज्यामध्ये जास्त प्रमाणात आयोडिनची कमतरता असलेले रुग्ण आढळुन येतात. गलगंड या आजारामुळे मानसिक व शारीरिक वाढ खुंटलेले रुग्ण आहेत.

राष्ट्रीय आयोडिन न्युनता विकार नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत आयोडिनची कमतरता असलेले रुग्ण शोधणे व गलगंड रुग्णांची शोध मोहिम राबविण्यांत येते. आरोग्य कर्मचारी मीठांच्या नमुन्यांची तपासणीसाठी नमुने घेऊन जिल्हा आरोग्य प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविले जातात.

आरोग्य कर्मचा-यांच्या मार्फत गलगंड संक्रमित भागातील व आदिवासी भागातील स्त्रीयांचे आरोग्य चांगले राहण्यासाठी व अर्भक मृत्यु रोखण्यासाठी आयोडिनयुक्त मीठाचे पॉकिट वाटप केले जाते.

गलगंड व आयोडिन कमतरता आढळुन आलेल्या भागातील लोकांचे लघवीचे नमुने घेऊन प्रयोगशाळेमध्ये तपासणीसाठी पाठविण्यांत येतात. गर्भधारणेनंतर आयोडिनची कमतरता असु नये अन्यथा बाळाच्या मेंदुवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असते.

या सर्व समस्या टाळण्यासाठी आयोडिन युक्त मीठाचा वापर करणे हाच एकमेव उपाय आहे. जो सहज आणि सोपा आहे. आपल्या शरीरातील थायरॉईड ग्रंथीकरिता आयोडिनची आवश्यकता असते. आपल्या शरीरासाठी १५० मायक्रोग्रॅम आयोडिनची आवश्यकता असते.

आपल्या शरीरासाठी वयोगटाप्रमाणे जागतिक आरोग्य संघटनानुसार आयोडिनची आवश्यकता खालीलप्रमाणे आहे. आहारामध्ये आयोडिनयुक्त मीठाचा समावेश करावा. संतुलीत व सकस आहाराचा समावेश असावा. जंकफुड, मॅगी, बॅर्गर इ.समावेश असु नये. गलगंडची लक्षणे दिसताच त्वरीत रुग्णालयामध्ये जाऊन औषधोपचार घेणे असे आवाहन जिप जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री भुसारे यांनी केले आहे.

### मत्स्योदरी अभियांत्रिकी...

महत, प्रा. जगदीश कायस्थ, प्रा. उद्धव टकले, प्रा. सीमा खरात, प्रा. रेणुका करवंदे, प्रा. श्रीराम बेलनूर, विद्युत विद्यार्थी परिषदेचे सरचिटणीस मोहम्मद कैफ, उपप्रतिनिधी कु. इशा पटणी, परिषदेचे इतर सदस्य आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. रिया उदावंत व कु. सिद्धी राठोड यांनी केले, तर मोहम्मद कैफ यांनी आभार प्रदर्शन केले.

### प्रशासन मतदानासाठी...

वितरण, मतपेट्यांची सुरक्षित वाहतूक, मतदानानंतर मतपेट्या जमा करण्याची व्यवस्था आणि मतमोजणी केंद्रावरील तयारी याबाबतही संबंधित जिल्हा प्रशासनाला आवश्यक सूचना देण्यात आल्या. औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघात आठ जिल्ह्यांचा समावेश असून, निवडणुकीसाठी ४१ उमेदवार रिंगणात आहेत. निवडणुकीसाठी एकूण ३ लाख २६ हजार ७०१ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. आठ जिल्ह्यांमध्ये ८४२ केंद्रांवर मतदान होणार आहे. शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान होणार आहे. मतपत्रिकेवर पसंतीक्रम नोंदवून मतदान करावयाचे असल्याने मतदारांना योग्य पद्धतीने मतदान करण्याबाबत मार्गदर्शन करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. निवडणूक प्रक्रिया शांततेत व पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी सतर्क राहावे. मतदानाच्या दिवशी उद्भवणाऱ्या संभाव्य अडचणींवर तातडीने उपाययोजना कराव्यात आणि सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वय राखावा, असे निर्देश विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी यावेळी दिले.

### अधर्मावर धर्माचा...

मात करण्यासाठी लवकरच उपाययोजना केल्या जात असल्याचे त्यांनी सांगितले. शेवटी त्यांनी उपस्थितांना विजयादशमीच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

आकर्षक आतिषबाजी आणि जयघोष या कार्यक्रमात रावणाच्या पुतळ्याचे दहन अत्यंत आकर्षक व रंगिबेरंगी आतिषबाजीच्या सहाय्याने करण्यात आले. रावण दहन होताच प्रभू श्रीरामांच्या विजयाचा जयघोष करत उपस्थितांनी ''सियावर रामचंद्र की जय'' आणि ''जय श्री राम'' च्या घोषणा दिल्या, ज्यामुळे संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.या सोहळ्यानंतर उपस्थितांनी एकमेकांना आपट्याची पाने देऊन सोनेरी शुभेच्छा दिल्या. मान्यवरांच्या प्रमुख उपस्थिती

या भव्य सोहळ्यास राहुल लोणीकर, नितीन जेथलिया, मोहन अग्रवाल, शहाजी राक्षे, आकाश राक्षे, गणेश निळे, प्राचार्य डॉ. भगवानराव दिरंगे, संपत टकले, गंगाधर पवार, भगवानराव मोरे, दया काटे, ओम मोर, संदिप बाहेकर, मनोहर खालापुरे, विजय नाना राखे, राजेश खंडेलवाल, बाबुराव हिवाळे, आबा कदम, सोनू अग्रवाल, सतीष सोनोने, राजेश भुजबळ, निहील सकलेचा , अमोल अग्रवाल राजेश मस्के , ऋषिकेश कराळे, शाकेर खतीब, कदीर कुरेशी, कृष्णा आरगडे, , अजिज सौदागर, संजय राऊत यांच्यासह सर्व राजकीय पक्षांचे आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते, पत्रकार बांधव आणि मोठ्या संख्येने सन्माननीय नागरिक उपस्थित होते.

सुव्यवस्था आणि परिश्रम

कार्यक्रमात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासन तसेच नगरपालिकाकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दसरा उत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार भारूका, कैलास सोळंके, अजय देसाई, माणिक जैस्वाल तसेच समितीच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी आयोजकांनी उपस्थित सर्व नागरिकांचे आभार मानले.

### श्यामाप्रसाद मुखर्जी...

आधारावर भारतीय जनता पार्टीने देशभरात संघटन उभे केले असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाच्या प्रगतीसाठी काम सुरू आहे. यावेळी माजी मंत्री आ. बबनरावजी लोणीकर म्हणाले की, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी रुजवलेल्या विचारधारेच्या बळावर भारतीय जनता पार्टीने देशभरात संघटन मजबूत केले आहे. भारतीय जनसंघाचा ७५ वर्षांचा हा प्रवास प्रत्येक कार्यकर्त्यासाठी अभिमानाची बाब आहे. प्रदेश सरचिटणीस सुनील राणे म्हणाले की, भविष्यात जेव्हा डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचा इतिहास लिहिला जाईल, तेव्हा जालन्यातील त्यांच्या स्मारकाचा उल्लेख आवर्जून केला जाईल. जालन्यातील हे स्मारक त्यांच्या विचारांची आणि राष्ट्रासाठी दिलेल्या योगदानाची आठवण करून देणारे ठरेल. यावेळी नगरसेवक वीरेंद्र धोका यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. तसेच डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी उद्यानाची जागा जालना महानगरपालिकेच्या ताब्यात मिळवून देण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या या प्रयत्नांमुळे उद्यानाच्या विकासकामांना मार्ग मोकळा झाल्याने उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन करून त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

# जलसुरक्षेच्या दिशेने ठोस पाऊल : टँकरद्वारे पाणीपुरवठ्याला पारदर्शकतेची नवी दिशा

पाणी हे जीवनाचे मूलभूत अधिष्ठान आहे. मानवी जीवनापासून शेती, पशुधन आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेपर्यंत प्रत्येक घटक पाण्यावर अवलंबून आहे. पावसाची अनिश्चितता आणि बदलत्या हवामानामुळे निर्माण होणारी पाणीटंचाई ही केवळ नैसर्गिक समस्या राहिलेली नाही, तर प्रभावी नियोजन आणि सुयोग्य व्यवस्थापनाची कसोटी ठरत आहे. अशा परिस्थितीत प्रत्येक नागरिकाला आवश्यक प्रमाणात स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे, ही प्रशासनाची महत्त्वपूर्ण जबाबदारी आहे. याच भूमिकेतून छत्रपती संभाजीनगर जिल्हा प्रशासनाने टंचाईग्रस्त भागातील टँकरद्वारे पाणीपुरवठ्यासाठी सर्वंकष कार्यपद्धती निश्चित केली आहे.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष विनय गौडा जी. सी. यांनी जिल्हास्तरीय पाणी टँकर संनियंत्रण व प्रत्यक्ष पाहणी समिती गठित करून पाणीपुरवठा व्यवस्थेत पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि अचूकता आणण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. ऑक्टोबर २०२६ ते जून २०२७ या संभाव्य टंचाई कालावधीचा विचार करून ही कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे.

गरजेनुसार पाणीपुरवठा, नियोजनाला प्राधान्य पाणीटंचाईच्या काळात टँकरद्वारे पाणीपुरवठा हा नागरिकांसाठी मोठा आधार ठरतो. मात्र, हा पुरवठा केवळ मागणीवर आधारित न राहता प्रत्यक्ष गरजेनुसार व्हावा, यासाठी प्रशासनाने स्पष्ट निकष निश्चित केले आहेत. संबंधित गावाची किंवा वाडी-वस्तीची लोकसंख्या विचारात घेऊन दरडोई प्रतिदिन २० लिटर पाण्याच्या निकषानुसार आवश्यक पाण्याचे प्रमाण निश्चित केले जाणार आहे. यासोबतच पशुधनाच्या पाण्याची गरजही विचारात घेतली जाणार आहे.

टँकरची मागणी करण्यापूर्वी ग्रामसभेचा अधिकृत ठराव आवश्यक करण्यात आला आहे. त्यामुळे पाणीपुरवठ्याच्या नियोजनात ग्रामस्थांचा सहभाग वाढणार असून स्थानिक गरजांचे वास्तव चित्र प्रशासनासमोर येण्यास मदत होईल.

*तंत्रज्ञानाच्या साहाय्याने पारदर्शकतेचा नवा अध्याय*

पाणीटंचाई निवारणाच्या व्यवस्थेत आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यावर प्रशासनाने भर दिला आहे. प्रत्येक अधिकृत शासकीय अथवा खासगी टँकरवर जीपीएस उपकरण बसविण्यात येणार आहे. त्यामुळे टँकरच्या प्रत्येक खेपेची नोंद, प्रवासाचे अंतर आणि प्रत्यक्ष पाणीपुरवठा यांची पडताळणी करणे शक्य होईल. टँकरच्या खेपांची डिजिटल नोंदवही ठेवण्यात येणार असून गावात पाणी पोहोचल्यानंतर ग्रामस्तरीय समितीच्या सदस्यांच्या स्वाक्षरीने त्याची खात्री केली जाईल. जीपीएस नोंदी आणि प्रत्यक्ष भरलेल्या पाण्याची पडताळणी केल्याशिवाय टँकरचे देयक अदा केले जाणार नाही.

या व्यवस्थेमुळे शासकीय निधीचा योग्य विनियोग होण्यास मदत होईल. विशेषतः कागदोपत्री नोंदी आणि प्रत्यक्ष पाणीपुरवठा यांतील तफावत टाळण्यासाठी ही कार्यपद्धती उपयुक्त ठरणार आहे.

*पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे संवर्धन*

पाणीटंचाईवर मात करण्यासाठी केवळ टँकरची संख्या वाढविणे पुरेसे नाही. उपलब्ध जलस्रोतांचे संरक्षण, पुनर्भरण आणि संवर्धनही तितकेच आवश्यक आहे. त्यामुळे टँकरची मागणी करणाऱ्या ग्रामपंचायतींना जलपुनर्भरणाच्या उपाययोजनांचे नियोजन करावे लागणार आहे. शिवकालीन पाणी साठवण योजना आणि जलपुनर्भरणाच्या कामांवर भर देण्यात आला आहे.

आजची पाणीटंचाई दूर करतानाच उद्याची जलसुरक्षा निर्माण करणे, हा या निर्णयामागील व्यापक दृष्टिकोन आहे. टँकर ही तात्पुरती गरज असली, तरी जलसंधारण ही भविष्याची शाश्वत गरज आहे. त्यामुळे टंचाई निवारणासोबत जलसंवर्धनाची सांगड घालण्याचा प्रशासनाचा प्रयत्न महत्त्वपूर्ण ठरतो. जलस्रोतांची पडताळणी आणि पाण्याच्या गुणवत्तेवर लक्ष सार्वजनिक जलस्रोतांची उपलब्धता संपल्याची खात्री केल्यानंतरच टँकर मंजुरीची कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यासाठी ग्रामपंचायतीचा ठराव आणि ग्राम महसूल अधिकारी व ग्रामसेवक यांचा संयुक्त पंचनामा आवश्यक असेल.

टँकर भरण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या जलस्रोतांची क्षमता, उपलब्धता आणि पाण्याची गुणवत्ता तपासली जाणार आहे. पाणीपुरवठ्याच्या स्रोतापासून गावापर्यंतचे अंतर जीपीएस किंवा गुगल मॅप्सद्वारे निश्चित केले जाणार आहे. अनावश्यक वाहतूक खर्च टाळण्यासाठीही प्रशासनाने स्पष्ट निर्देश दिले आहेत.




पिण्याचे पाणी केवळ उपलब्ध होणे पुरेसे नसून ते सुरक्षित आणि आरोग्यदायी असणेही आवश्यक आहे. त्यामुळे पाण्याची नियमित गुणवत्ता तपासणी, सार्वजनिक वितरण टाक्यांची स्वच्छता आणि निर्जंतुकीकरण यावर विशेष लक्ष दिले जाणार आहे.

कोणतीही योजना प्रभावी ठरण्यासाठी तिची काटेकोर अंमलबजावणी आणि नियमित संनियंत्रण आवश्यक असते. याच अनुषंगाने जिल्ह्यात कार्यरत एकूण टँकरपैकी किमान पाच टक्के टँकरची अचानक तपासणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वरिष्ठ अधिकारी टंचाईग्रस्त गावांना प्रत्यक्ष भेटी देऊन मंजूर खेपा, प्रत्यक्ष पाणीपुरवठा, जलस्रोतांची स्थिती आणि ग्रामपंचायत स्तरावरील नोंदींची पडताळणी करणार आहेत. त्यामुळे पाणीपुरवठ्यातील संभाव्य अनियमितता रोखण्यास मदत होईल. या संपूर्ण व्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्यासाठी अपर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती कार्यरत राहणार आहे. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे सदस्य, तर तहसीलदार (नियोजन व आपत्ती व्यवस्थापन) सदस्य सचिव म्हणून जबाबदारी पार पाडणार आहेत. टँकरच्या खेपांमध्ये अनियमितता, बनावट नोंदी किंवा आदेशाचे उल्लंघन आढळल्यास संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि कंत्राटदारांविरुद्ध आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ तसेच भारतीय न्याय संहितेतील संबंधित तरतुदींनुसार कारवाई करण्यात येणार आहे.

*लोकसहभागातून शाश्वत जलसुरक्षेकडे*

पाणीटंचाई निवारण ही केवळ प्रशासकीय यंत्रणेची जबाबदारी नसून त्यात ग्रामपंचायत, स्थानिक संस्था आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. पाण्याचा काटकसरीने वापर, उपलब्ध स्रोतांचे संरक्षण, पावसाच्या पाण्याचे संकलन आणि जलपुनर्भरण यांसारख्या उपक्रमांतून गावपातळीवर जलसुरक्षेचा पाया मजबूत करता येऊ शकतो.

छत्रपती संभाजीनगर जिल्हा प्रशासनाने निश्चित केलेली ही सर्वंकष कार्यपद्धती म्हणजे केवळ टँकर व्यवस्थापनातील सुधारणा नाही, तर लोकाभिमुख, तंत्रज्ञानाधिष्ठित आणि उत्तरदायी प्रशासनाच्या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

पाण्याचा प्रत्येक थेंब मौल्यवान आहे आणि तो गरजू नागरिकांपर्यंत योग्य वेळी, योग्य प्रमाणात व सुरक्षित स्वरूपात पोहोचणे हीच प्रभावी जलव्यवस्थापनाची खरी कसोटी आहे. या कार्यपद्धतीची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास टंचाईग्रस्त भागातील नागरिकांना दिलासा मिळण्याबरोबरच पाणीपुरवठा व्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ होण्यास मदत होईल. जलसंधारणातून जलसमृद्धी आणि पारदर्शक व्यवस्थापनातून जलसुरक्षा, हाच शाश्वत भविष्याचा मार्ग आहे.

**संजीवनी जाधव पाटील**
**माहिती अधिकारी**
**जिल्हा माहिती अधिकारी,**
**छत्रपती संभाजीनगर**

## साजीद शेख यांच्याविरोधात गुन्हा दाखल करा; नागरिकांचे निवेदन

*पोलीस प्रशासनाला बदनाम केल्याचा आरोप; नगरसेवक साजीद जलील शेख यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यासाठी निवेदन*

**मंठा -प्रतिनिधी**

मंठा नगरपंचायतीचे नगरसेवक साजीद जलील शेख यांनी सोशल मीडियावर केलेल्या एका पोस्टवरून वाद निर्माण झाला आहे. या पोस्टमुळे पोलीस प्रशासनाची बदनामी होत असल्याचा आरोप करत मंठा येथील भारतप्रेमी नागरिकांनी संबंधित नगरसेवकाविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.यासंदर्भात मंठा पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकांना निवेदन देण्यात आले आहे. निवेदनात १९ ऑक्टोबर २०२६ रोजी सोशल मीडियावर शेअर करण्यात आलेल्या पोस्टचा उल्लेख करण्यात आला आहे. या पोस्टमध्ये अतिक अहमद, उमर



खालिद, मुख्तार अन्सारी आणि लॉरेन्स बिश्नोई यांच्याबाबत पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित करण्यात आल्याचे निवेदनात म्हटले आहे.संबंधित पोस्टमुळे पोलीस प्रशासनाची प्रतिमा मलिन होत असल्याचा आरोप निवेदनकर्त्यांनी केला आहे. तसेच पोस्टमधील विधानांची चौकशी करून संबंधित नगरसेवकाविरोधात कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.या निवेदनाच्या प्रती विभागीय पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर, जिल्हाधिकारी जालना, पोलीस अधीक्षक जालना आणि उपविभागीय पोलीस अधिकारी, परतूर यांनाही देण्यात आल्या आहेत.दरम्यान, या प्रकरणात पोलिसांकडून काय कारवाई केली जाते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## सकाळी ७.२९ रेल्वे डब्यात साई भजन मंडळाने मोठ्या उत्साहात दसरा सण केला साजरा

**डोंबिवली -प्रतिनिधी**

विजयादशमीच्या निमित्ताने दरवर्षी आपापल्या रेल्वेच्या डब्यात विजयादशमी हा सण जोरदार पद्धतीने साजरा केला जातो. यंदाही हा सण साई भजन मंडळ (डोबिवली- दिवा ) यांनी अतिउत्साहीत आणि जल्लोषात साजरा केला. यावेळी वारकरी परंपरा जपत या मंडळाचे अध्यक्ष श्री. अंकुश बोरगे बुवा यांनी एक देश, एक गणवेष असे दाखवून दिले. उपाध्यक्ष श्री. प्रविण मेढेकर बुआ यांनी प्रवासाबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले, यांचवेळी साप्ताहिक प्रकट महाराष्ट्र युट्युब चॅनेल आणि डिजिटल मीडियाचे डोंबिवली प्रतिनिधी श्री. दिनेश हुमणे यांचा सत्कार अध्यक्ष अंकुश बोरगे यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच डोंबिवली स्थानकचे रेल्वे मास्तर, रेल्वे पोलीस अधिकारी, आणि




मोटरमन यांचाही सत्कार करण्यात आला.

भजन मंडळाचे अध्यक्ष श्री. अंकुश बोरगे यांनी भजनाच्या तालावर सर्वांना मंत्रमुग्ध करून भजन परिसर दुमदुमून टाकले. प्रत्येकाचे पाय या गाडीकडे आकर्षण करीत होते. गाडी पूर्णपणे हार, फुगे, पताके, लावून पारंपारिक पद्धतीने सजविली होती, नारळ वाढवून गाडीची आणि देवीची पूजा, आरती केली जाते. यंदा पूजेचा मान श्री. दिपक कांबळे आणि संतोष वनगे यांना मिळाला. हा रोजचा येण्याजाण्याचा प्रवास सुखकर व्हावा याचे गाऱ्हाणे घालण्यात सर्व भजन आणि प्रवासी हातभार लावत असतात, यावेळी विकास हळदवणेकर, उमेश घरवे, राकेश गायकवाड, विजय वर्दम, अशोक शिंदे, सचिन बेलकर, प्रशांत नारकर, सुदर्शन सांगले, नितीन देवकर, दिंगबर बच्छाव, श्रीकांत रामाने, संतोष निकम, सुभाष केंजळे, कृष्णा साळवी, सुरेश मोरे,नंदकिशोर आग्रे, कालिदास गायकवाड, प्रमोद पाटील, सुधीर सावंत, सत्यम मिरगळ, अभिजीत घाग,आणि या भजन मंडळात महिलांचा समावेश आणि उत्स्फूर्त प्रतिसाद दिसून येत होता. आदी मंडळी उपस्थित होती. आणि अश्याप्रकारे ७.२९ डोंबिवली ते सीएसटी प्रवासाने विजयादशमी साजरी झाली.

## खरवली विभाग शाखेतील आमडोशी येथे ७० वा धम्मचक्र प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात संपन्न

**बोरघर, माणगांव - विश्वास गायकवाड**

बौद्ध धम्माच्या इतिहासातील सुवर्ण दिन म्हणून ओळखला जाणारा ७० वा धम्मचक्र प्रवर्तन दिन आमडोशी येथे अत्यंत उत्साहात, शिस्तबद्ध आणि मंगलमय वातावरणात संपन्न झाला. बौद्धजन पंचायत समिती शाखा क्र. ५ खरवली विभाग व आमडोशी बौद्धजन सेवा संघ, स्थानिक व मुंबई, महिला मंडळ आमडोशी यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दिनांक २० ऑक्टोबर रोजी या भव्य दिव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बौद्धजन पंचायत समिती शाखा क्र. ५ खरवली विभागाचे अध्यक्ष विवेक जाधव होते.

सकाळी १०.०० वाजता राजेश शांताराम कासारे अध्यक्ष, स्थानिक भावकी यांच्या शुभहस्ते धम्मध्वजारोहणाने कार्यक्रमाची मंगलमय सुरुवात झाली. बौद्ध उपासक लक्ष्मण मोरे यांनी अत्यंत मंगलमय वातावरणात धम्म संस्कार विधी संपन्न केली. त्यानंतर अमोल मोहिते सरचिटणीस, राजेश कासारे उपाध्यक्ष, ऑडिटर संतोष मोरे, आणि संदेशवाहक निलेश जाधव यांनी उपस्थितांचे स्वागत केले. अध्यक्ष विवेक जाधव यांनी आपले अध्यक्षीय प्रास्ताविक सादर केले. तद्नंतर कुमार आरुष नितीन कासारे या छोट्या बालकाने धम्मचक्र प्रवर्तन दिन आणि क्रुर चंड अशोक ते धम्म प्रिय चक्रवर्ती सम्राट अशोक या ऐतिहासिक विषयावर आपल्या बाल वाणीतून भाषण करून उपस्थितांची मने जिंकली. तद्नंतर प्रमुख मार्गदर्शक पराग जाधव यांनी_ ‘‘धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे महत्त्व_‘ या विषयावर प्रवचन दिले.

दुपारी विशेष सत्कार उपक्रमांतर्गत रायगड भूषण, माणगाव तालुक्यासह खरवली विभागाचा ढाण्या वाघ, बौद्ध समाजाचा बुलंद आवाज, सामाजिक कार्यकर्ते नामदेव कासारे यांना शाखेच्या वतीने सन्मानपूर्वक खरवली विभाग भूषण हा मानाचा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

तद्नंतर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या मान्यवरांचा सत्कार समारंभ आणि गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळा संपन्न झाला. सत्कार समारंभ बौद्धजन पंचायत समिती शाखा क्र. ५ यांच्या सौजन्याने तर विद्यार्थी गुणगौरव नंदू अशोक कांबळे यांच्या सौजन्याने पार पडला. यामध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. दरम्यान दुपारी बौद्धजन पंचायत समिती तालुका शाखा माणगाव चे अध्यक्ष रवींद्र मोरे, सचिव रघुनाथ साळवी, कायदेशीर सल्लागार मुंबई उच्च न्यायालयाचे जेष्ठ विधीज्ञ ॲडव्होकेट नरेश जाधव, बुद्धीस्ट इंटरनॅशनल नेटवर्क चे सुर्यकांत कासे, शहर शाखा क्रमांक सहा चे अध्यक्ष निलेश साळवी सचिव अरविंद मोरे इत्यादींचे आगमन झाले. माणगाव तालुक्यातील नाणोरे येथील वर्षावास धम्म प्रवचन मालिका कार्यक्रम पार



पाडून तालुका अध्यक्ष रवींद्र मोरे आणि त्यांच्या शिष्टमंडळाने या कार्यक्रमाला आवर्जून लावलेल्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला नव चैतन्य आले. आणि कार्यक्रमाचा उत्साह द्विगुणित झाला. तद्नंतर तालुका अध्यक्ष रवींद्र मोरे यांनी सर्व उपस्थितांना धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या शुभेच्छा देऊन उपस्थित धम्म उपासक आणि उपासिका यांना संबोधित करुन आगामी कार्यक्रमांच्या आयोजन नियोजन, सहभाग आणि उपस्थिती विषयी अधिसूचना दिल्या. तद्नंतर भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. दि. यशवंत जयराम कासारे व दि. वैजयंती यशवंत कासारे यांच्या स्मरणार्थ कुमार, शेखर व सागर कासारे यांच्या सौजन्याने भोजन तर दि. गणेश सखाराम मोहिते यांच्या स्मरणार्थ अक्षय गणेश मोहिते यांच्या सौजन्याने पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

तद्नंतर रोहित सकपाळ खजिनदार, संतोष बाळाराम मोरे ऑडिटर आणि निलेश मारुती जाधव संदेशवाहक यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली.

या कार्यक्रमास तालुका सह सचिव रणजित मोहिते, तालुका प्रसिद्धी प्रमुख पत्रकार विश्वास गायकवाड, शाखा क्रमांक आठ अध्यक्ष संदेश साळवी, कृषी विभागाचे परमेश्वर गाडे, भारतीय डाक विभागाचे विनोद जाधव, संतोष कळंबे, महेंद्र कासारे,गौतम कासारे, एडवोकेट अंकेत कासारे, तुषार जाधव, सौरभ जाधव, संपादक अविष्कार गायकवाड इत्यादी मान्यवरांसह आमडोशी बौद्धजन सेवा संघ स्थानिक व मुंबई, महिला मंडळ, बौद्ध सेवा संघ खरवली, संघर्ष महिला मंडळ, बौद्धजन सेवा संघ बोरघर, संघमित्रा महिला मंडळ, बौद्ध सेवा संघ उमरोली, माता रमाई महिला मंडळ, पंचशील मित्र मंडळ बोर्ले, नालंदा बौद्धजन सेवा संघ पेण, पंचशील महिला मंडळ, सारनाथ बौद्ध विकास मंडळ सुरव व इतर सर्व संलग्न मंडळांचे पदाधिकारी व बौद्ध बांधव-भगिनी उपासक आणि उपासिका मोठ्या संख्येने शुभ्र वस्त्र परिधान करून उपस्थित होते.

# ‘आम्ही चुकलो जरी... तू चुकू नको अंबाबाई!’ भावपूर्ण जयघोषात दुर्गामातेला निरोप

## जालन्यात दुर्गामाता विसर्जन उत्साहात

**जालना - प्रतिनिधी**

‘‘दुर्गा माता की जय’’, ‘‘आम्ही चुकलो जरी, तरी काही जरी तू चुकू नको अंबाबाई!’’ अशा भक्तिभावाने ओथंबलेल्या जयघोषात जालन्यात आज दुर्गामातेच्या मूर्तींना भावपूर्ण निरोप देण्यात आला. नऊ दिवसांच्या भक्ती, उपासना आणि उत्साहानंतर माताराणीला निरोप देताना भाविकांच्या चेहऱ्यावर उत्सवाचा आनंद, तर मनात पुढील वर्षी पुन्हा आगमनाची आस दिसून आली. डीजे, ढोल-ताशांचा गजर, दांडियाचा ताल आणि महिलांच्या फुगडीने शहरातील विसर्जन मिरवणुकांना उत्सवी रंग चढला होता. शहरातील विविध दुर्गा मंडळांच्या वतीने दुर्गामातेच्या मूर्तींच्या विसर्जनासाठी मिरवणुका काढण्यात आल्या. आकर्षक सजावट, भक्तिमय वातावरण आणि जयघोषांनी शहरातील वातावरण दुमदुमून गेले. मिरवणुकीत सहभागी झालेल्या भाविकांनी नृत्याच्या तालावर आनंद व्यक्त केला. काही ठिकाणी दांडियाचे फेर धरले गेले, तर महिलांनी पारंपरिक फुगडी खेळत मिरवणुकीतील उत्साहात भर घातली. ढोल-ताशांच्या निनादात आणि डीजेच्या तालावर तरुणाईसह भाविक मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते.

**‘तू चुकू नको अंबाबाई’च्या आर्त स्वरांत भावनिक निरोप**

विसर्जन मिरवणुकांमध्ये सर्वाधिक लक्ष वेधून घेतले ते माताराणीला निरोप देताना म्हटल्या जाणाऱ्या भावपूर्ण गीताने‘‘आम्ही चुकलो जरी, तरी काही जरी तू चुकू नको अंबाबाई!’’ या शब्दांतून भक्तांनी आपल्या चुका, संकटे आणि अडचणी माताराणीच्या चरणी सोपवत तिच्या कृपेची आर्त विनवणी केली. या गीताच्या स्वरांत भक्तीबरोबरच भावनिक ओलावाही जाणवत होता. उत्सवातील जल्लोष आणि



विसर्जनाच्या क्षणी निर्माण होणारी हुरहूर, असे दोन्ही भाव एकाच वेळी अनुभवायला मिळाले. नऊ दिवस घराघरांत आणि मंडपांत पूजल्या गेलेल्या दुर्गामातेचा निरोप घेताना अनेक भाविकांनी हात जोडून दर्शन घेतले. ‘‘पुढच्या वर्षी लवकर या’’, अशी मनोमन प्रार्थना करत माताराणीला निरोप देण्यात आला.

**मम्मादेवी मंदिरात मंडळांच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार**

विसर्जन सोहळ्याच्या निमित्ताने मम्मादेवी मंदिर येथे विविध दुर्गा मंडळांच्या अध्यक्ष व सचिवांचा सत्कार करण्यात आला. उत्सवाच्या आयोजनात सहभागी झालेल्या मंडळांच्या पदाधिकाऱ्यांचा सन्मान करून त्यांच्या सहभागाची दखल घेण्यात आली. दुर्गोत्सवाच्या माध्यमातून भक्ती, सामाजिक सहभाग आणि सामूहिक उत्साहाची परंपरा जपली जात असल्याचे या सोहळ्यातून दिसून आले.

**मोती तलावातील विसर्जन कुंडात मूर्तींचे विसर्जन**

शहरातील विविध मंडळांच्या मिरवणुका विसर्जनासाठी मोती तलाव येथील विसर्जन कुंडाकडे मार्गस्थ झाल्या. तेथे दुर्गामातेच्या मूर्तींचे विधिवत विसर्जन करण्यात आले. भक्तिभावाने आरती, प्रार्थना आणि जयघोष करत भाविकांनी माताराणीला निरोप दिला. विसर्जनाच्या वेळी धार्मिक परंपरेचे पालन करत उत्सवाची सांगता करण्यात आली.

**मनपा आणि पोलीस प्रशासनाच्या प्रयत्नांतून शांततेत सोहळा**

दुर्गामाता विसर्जन सोहळा शांततेत पार पडण्यासाठी महानगरपालिका आणि पोलीस प्रशासनाने प्रयत्न केले. विविध मंडळांच्या मिरवणुका आणि विसर्जन प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर संबंधित यंत्रणांनी समन्वय साधला. प्रशासनाच्या प्रयत्नांमुळे विसर्जन सोहळा शांततेत पार पडल्याचे चित्र दिसून आले. दुर्गोत्सवाच्या नऊ दिवसांत भक्ती, उत्साह आणि सांस्कृतिक परंपरेचा अनुभव घेतल्यानंतर जालन्यातील भाविकांनी माताराणीला निरोप दिला. ‘‘आम्ही चुकलो जरी तू चुकू नको अंबाबाई!’’ या भावपूर्ण शब्दांतून व्यक्त झालेली श्रद्धा आणि ‘‘पुढच्या वर्षी लवकर या’’ ही अपेक्षा मनात ठेवत दुर्गामातेच्या विसर्जन सोहळ्याची सांगता झाली.

## भगवान बालाजींची पालखी मिरवणूक उत्साहात गोविंदा गोविंदाच्या गजरात हजारो भाविकांनी घेतले दर्शन

**जालना - प्रतिनिधी**

जुना जालना भागातील कचेरी रोड येथील प्राचीन बालाजी मंदिरात दसऱ्यानिमित्त मंगळवारी परंपरागत पद्धतीने भगवान बालाजींची पालखी मिरवणूक रात्री दहा वाजता काढण्यात आली. यामध्ये वारकरी भजनी मंडळ, तसेच गोविंद गर्जना ढोल पथक आणि अन्य भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

गोविंदा गोविंदाच्या गजरामध्ये ही पालखी मिरवणूक कचेरी रोड, वृंदावन कॉलनी, मुक्तेश्वर महादेव मंदिर, इतवारा मोहल्ला, कोळेश्वर गल्ली, गणपती गलली, शास्त्री मोहल्ला, आनंदी स्वामी गल्ली मार्गे मंदिरात पहाटे तीन वाजेच्या दरम्यान दाखल झाली. यावेळी महिला भाविकांचीही मोठी उपस्थिती होती. या पालखीचे ठिकठिकाणी सडा, रांगोळ्या काढून स्वागत करण्यात आले. महिलांनी औक्षण केले. वृंदावन कॉलनी, कोळेश्वर गल्ली, कचेरी रोड परिसरात पालखीतील भाविकांसाठी चहा व दुधाची व्यवस्था करण्यात आली होती. कोळेश्वर गल्लीत पालखीवर पुष्पवृष्टी करण्यात आली. यावेळी जि.प.चे माजी अध्यक्ष अनिरूद्ध खोतकर, माजी नगराध्यक्ष भास्कराव अंबेकर, स्थायी समितीचे सभापती अशोक पांगारकर, नगसेवक श्रीकांत पांगारकर, स्वयंभू गणपती संस्थानचे रवी महाराज जहागीरदार, विनायक महाराज फुलंबीकर, आनंदी स्वामी संस्थानचे अमित महाराज ढोले यांच्यासह अन्य मान्यवरांनी पालखीचे दर्शन घेतले. परंपरेप्रमाणे पालखी बांधण्याचा मान परिसरातील गुजराथी समाजाचा असून यंदाही गुजराथी समाजाच्या वतीने ही सेवा देण्यात आली. दरम्यान, ज्येष्ठ विधिज्ञ एस.एम.देशपांडे यांनी तसेच त्यांच्या पत्नी अपर्णा देशपांडे तसेच आश्विनी बदनापूरकर यांनी संपूर्ण पालखीत कापूर आरतीची सेवा दिली. तसेच भगवद् गीतेच्या अभ्यासक, सेवा निवृत्त शिक्षिका सुमन नामेवार यांच्या वतीने सर्व भाविकांनी चहाची व्यवस्था करण्यात आली होती. या मंदिरातील उत्सवाची सांगता २५ ऑक्टोबर रोजी होणार आहे. यानिमित्त रात्री आठ वाजता धर्माचार्य पुंडलिक महाराज आळंदीकर यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे.

## श्यामाप्रसाद मुखर्जी उद्यान आता जालना महानगरपालिकेच्या ताब्यात जनसंघ स्थापना दिनानिमित्त भाजपाची भव्य रॅली व जाहीर सभा

### जालन्यातील श्यामाप्रसाद मुखर्जी स्मारकाचा इतिहासात आवर्जून उल्लेख होईल - भाजपा प्रदेश सरचिटणीस सुनील राणे

**जालना - प्रतिनिधी**

भारतीय जनसंघाच्या स्थापनेला ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त भारतीय जनता पार्टी, जालना महानगरच्या वतीने बुधवार, दि. २१ ऑक्टोबर २०२६ रोजी जालना शहरात भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले. वीर सावरकर चौक येथून फुलंब्रीकर नाट्यगृहापर्यंत काढण्यात आलेली ही रॅली मोठ्या उत्साहात संपन्न झाली रॅलीच्या समारोपानंतर डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी ‘‘एक देश में दो प्रधान, दो निशान और दो विधान नहीं चलेंगे’’ या त्यांच्या ऐतिहासिक घोषणेचे स्मरण करून त्यांच्या राष्ट्रनिष्ठ विचारांना उजाळा देण्यात आला. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी उद्यानाची जागा मागील अनेक वर्षांपासून वादात अडकली होती. अखेर ही जागा जालना शहर महानगरपालिकेच्या ताब्यात आल्याने उद्यानाच्या उर्वरित



रखडलेल्या विकासकामांचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे या परिसराचा विकास होण्यास गती मिळणार असून, नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

यावेळी माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे, माजी मंत्री आ. बबनरावजी लोणीकर, प्रदेश सरचिटणीस सुनील राणे, आ. नारायण कुचे, माजी आ.कैलास गोरंट्याल, भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, राहुल भैया लोणीकर, मराठवाडा संयोजक नितीन काळे, किरण पाटील, भाजप मराठवाडा कार्यालय प्रमुख धनंजय कुलकर्णी, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, स्थायी समिती सभापती अशोक पांगारकर, रामेश्वर भांदरगे, बद्रीनाथ पठाडे, भाजपा सरचिटणीस सुनील पवार, संगीताताई गोरंट्याल यांच्यासह भाजपा नगरसेवक, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे म्हणाले की, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी देशाच्या एकात्मतेसाठी दिलेले योगदान आणि जनसंघाच्या माध्यमातून मांडलेले विचार आजही मार्गदर्शक आहेत. त्याच विचारांच्या *(पान २ वर)*

## जालना पोलीस मुख्यालयात विजयादशमीचा उत्साह; शस्त्रपूजन, वाहनपूजनासह पोलीस बँडच्या साहित्याचे पूजन!

### पोलीस अधीक्षक तेघबीरसिंग संधू यांच्या हस्ते विधिवत पूजन; कर्तव्यनिष्ठा व जनसेवेचा संकल्प अधोरेखित

**जालना - प्रतिनिधी**

विजयादशमी अर्थात दसरा सणाचे औचित्य साधून जालना जिल्हा पोलीस मुख्यालयात शस्त्रपूजन, वाहनपूजन आणि पोलीस बँडच्या साहित्याचे पूजन उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. मंगळवार, २० ऑक्टोबर रोजी दुपारी ४ वाजताच्या सुमारास पार पडलेल्या या सोहळ्यात जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक तेघबीरसिंग संधू यांच्या हस्ते विधिवत पूजन करण्यात आले. पोलीस दलाची परंपरा, शिस्त आणि कर्तव्याप्रती असलेली बांधिलकी जपणारा हा कार्यक्रम श्रद्धा व उत्साहात पार पडला.

या वेळी अपर पोलीस अधीक्षक डॉ. विक्रम साळी, पोलीस उपअधीक्षक अनंत कुलकर्णी, राखीव पोलीस निरीक्षक भाऊसाहेब वाघ, तसेच पदोन्नतीने परभणी येथे नियुक्त झालेले राखीव पोलीस निरीक्षक जयसिंग इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती. याशिवाय दत्ता पवार, संजय सोनवणे, सर्व डी.आय. मास्तर आणि पोलीस अंमलदार या पूजन सोहळ्यात सहभागी



झाले होते. विजयादशमी हा सण शौर्य, पराक्रम, विजय आणि नव्या संकल्पांचे प्रतीक मानला जातो. भारतीय परंपरेत या दिवशी शस्त्रपूजनाला विशेष महत्त्व आहे. विविध क्षेत्रांतील व्यक्ती आणि संस्था आपल्या कार्याशी संबंधित साधने, उपकरणे व वाहनांचे पूजन करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करतात. पोलीस दलातही ही परंपरा श्रद्धेने आणि उत्साहाने जपली जाते. कायदा व सुव्यवस्था राखणे, गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवणे, आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत पोहोचविणे आणि नागरिकांच्या जीवित व मालमत्तेचे संरक्षण करणे, अशा विविध जबाबदाऱ्या पोलीस दलाला पार पाडाव्या लागतात. या कर्तव्यांसाठी शस्त्रे, वाहने आणि विविध उपकरणे महत्त्वाची ठरतात. त्यामुळे विजयादशमीच्या निमित्ताने या साधनांचे पूजन करणे ही पोलीस दलातील महत्त्वाची परंपरा आहे. जालना पोलीस मुख्यालयात आयोजित सोहळ्यात पोलीस दलातील शस्त्रे, विविध वाहने आणि पोलीस बँडच्या साहित्याचे पूजन करण्यात आले. पोलीस अधीक्षक तेघबीरसिंग संधू यांच्या हस्ते विधिवत पूजन करून या परंपरेचे पालन करण्यात आले. पोलीस दलाच्या दैनंदिन कामकाजात वाहनांना विशेष महत्त्व असते. गस्त घालणे, घटनास्थळी तातडीने पोहोचणे, बंदोबस्ताची जबाबदारी पार पाडणे आणि आपत्कालीन परिस्थितीत मदतकार्य करणे यासाठी पोलीस वाहनांचा उपयोग होतो. त्याचप्रमाणे पोलीस बँड हा शासकीय समारंभ, संचलन आणि विविध औपचारिक कार्यक्रमांचा महत्त्वाचा भाग आहे. या साहित्याचे पूजन करून पोलीस दलाने आपल्या परंपरेचा सन्मान केला.

या कार्यक्रमाला जिल्हा पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी, पोलीस निरीक्षक आणि विविध पदांवरील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सर्वांनी एकत्रितपणे विजयादशमीचा सण साजरा करत पोलीस दलातील परंपरा आणि शिस्तीचे महत्त्व अधोरेखित केले. राखीव पोलीस निरीक्षक जयसिंग इंगळे यांची परभणी येथे पदोन्नतीने नियुक्ती झाल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांची या कार्यक्रमातील उपस्थितीही लक्षवेधी ठरली. दत्ता पवार, संजय सोनवणे यांच्यासह डी.आय. मास्तर आणि पोलीस अंमलदारांनीही पूजन सोहळ्यात सहभाग नोंदविला. सण-उत्सवांच्या काळात कायदा व सुव्यवस्था राखण्याबरोबरच नागरिकांची सुरक्षितता सुनिश्चित करण्याची महत्त्वाची जबाबदारी पोलीस दलावर असते.

गर्दीचे नियोजन, वाहतूक नियंत्रण, गुन्हेगारीला प्रतिबंध आणि आपत्कालीन परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी पोलीस यंत्रणा सतत सज्ज असते. विजयादशमीच्या निमित्ताने करण्यात आलेले शस्त्रपूजन आणि वाहनपूजन हे केवळ धार्मिक परंपरेचे पालन नसून, कर्तव्याप्रती निष्ठा आणि जबाबदारीची जाणीव दृढ करण्याचे प्रतीकही मानले जाते.

## जालन्यातील घरफोडीचा गुन्हा उघड; दोघांना अटक, ५० हजारांचा मुद्देमाल हस्तगत!

### कदीम जालना पोलिसांची विशेष कामगिरी; गुप्त माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपींचा शोध

**जालना - प्रतिनिधी**

जालना शहरातील जुन्या जालना परिसरात घराचे कुलूप तोडून घरातील साहित्य चोरून नेल्याच्या प्रकरणाचा कदीम जालना पोलिसांनी यशस्वीरीत्या छडा लावला आहे. या घरफोडीप्रकरणी दोन संशयित आरोपींना ताब्यात घेऊन अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून चोरीस गेलेला सुमारे ५० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. गुप्त माहितीदारांकडून मिळालेली माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांनी ही कारवाई केली.

**जुने घर लक्ष्य करून घरफोडी**

या प्रकरणातील फिर्यादी १७ ऑक्टोबर २०२६ रोजी कदीम जालना पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी आले होते. फिर्यादींच्या म्हणण्यानुसार, १४ ऑक्टोबर रोजी सायंकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास ते जुन्या घरात सामान आणण्यासाठी गेले होते. त्यावेळी घरातील सर्व साहित्य व्यवस्थित होते.

मात्र, १५ ऑक्टोबर रोजी दुपारी साडेचार वाजेच्या सुमारास एका साक्षीदाराने फिर्यादींना त्यांच्या जुन्या घराचे कुलूप तोडण्यात आल्याची माहिती दिली. ही माहिती मिळताच फिर्यादींनी घराकडे धाव घेतली आणि प्रत्यक्ष पाहणी केली. त्यावेळी घराचे कुलूप तोडून घरात चोरी झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

घरातील कपाटात ठेवलेली शिलाई मशीन, पितळी समई, सायकल, पाण्याची मोटारपंप तसेच अन्य साहित्य चोरीला गेल्याचे आढळून आले. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली होती. या प्रकरणाची गंभीर दखल घेत कदीम जालना पोलिसांनी तातडीने गुन्हा दाखल केला. याप्रकरणी कदीम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ५९८/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५(अ),




३३१(३) आणि ३३१(४) अंतर्गत गुन्ह्याची नोंद करण्यात आली. या गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार खलील बेग यांच्याकडे सोपविण्यात आला. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देत तपास अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. तसेच अज्ञात आरोपींचा शोध घेऊन गुन्हा उघडकीस आणण्यासाठी दोन स्वतंत्र तपास पथके तयार करण्याचे आदेश देण्यात आले. तपास पथकांनी घटनास्थळाची माहिती, गुप्त बातमीदारांकडून मिळणारे धागेदोरे आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपासाची दिशा निश्चित केली. या तपासादरम्यान घरफोडीच्या गुन्ह्यात सचिन बाबुराव गायकवाड (वय २४, रा. कैकाडी मोहल्ला, जुना जालना) आणि रामेश्वर भगवान गायकवाड (वय २६, रा. जामा मस्जिद, मोरंडी मोहल्ला, जुना जालना) यांचा सहभाग असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे सखोल चौकशी केली असता, त्यांनी गुन्ह्यात सहभाग असल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. आरोपींकडून घरफोडीच्या गुन्ह्यात चोरीस गेलेले सुमारे ५० हजार रुपये किमतीचे साहित्य हस्तगत करण्यात आले आहे. यामध्ये फिर्यादींच्या तक्रारीत नमूद असलेल्या शिलाई मशीन, पितळी समई, सायकल, पाण्याची मोटारपंप आणि अन्य साहित्याचा समावेश असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. या प्रकरणात दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली असून, गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे. या घरफोडीमागील इतर काही बाबींचा तपासातून उलगडा होतो का, याकडे लक्ष लागले आहे. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई ही कारवाई जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक तेघबीरसिंग संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.कदीम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जे. बी. शेवाळे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस हवालदार सचिन चौधरी, सदा राठोड, धनाजी कावळे, खलील बेग तसेच पोलीस कर्मचारी मतीन शेख, इम्रान खान, दिलीप गायकवाड आणि विलास बोराडे यांनी या कारवाईत सहभाग घेतला. गुप्त माहितीचे संकलन, तांत्रिक विश्लेषण आणि समन्वयातून तपास करत कदीम जालना पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा उघडकीस आणत चोरीचा मुद्देमाल हस्तगत केला. या कारवाईमुळे घरफोडीच्या तपासात पोलिसांना महत्त्वाचे यश मिळाले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.